गांधी एज्युकेशन सोसायटी,कुंडलचे

# क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय,कुंडल

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२२ – २०२३

### अहवाल

शुक्रवार दि. १२ मे २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक पारितोषिक समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समारंभाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील (आबा ) यांनी भूषवले. मा. श्री शरद (भाऊ ) लाड (गटनेते तथा जि. प. सदस्य सांगली ) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर समारंभास संस्थेचे उपाध्यक्ष , सचिव , खजिनदार , सुपरिटेंडेंट व इतर सर्व पदाकरी उपस्थित होते. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व विजयाकाकू लाड यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयात झालेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, कला व क्रीडाविषयक घडामोडींचा थोडक्यात आढावा घेतला. सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या कामाचे आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी उपस्थित मान्यवरांचे शाल आणि सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले.

सर्वांच्या सत्कारानंतर शैक्षणिक, सांस्कृतिक, कला व क्रीडाक्षेत्रामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. समारंभाचे प्रमुख पाहुणे शरद (भाऊ) लाड यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना महाविद्यालयीन जीवन हा शैक्षणिक कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा असतो. हे शिक्षण पूर्ण होताच नोकरी शोधणे, स्थिरस्थावर होणे याबरोबरच जबाबदारी वाढणे या गोष्टी ओघाने येतात. जीवनमान बदलत चालले आहे तसे सर्वच गोष्टी वेगाने बदलत चालल्या आहेत. या वेगाबरोबर जायचे असेल व यशस्वी व्हायचे असेल तर कौशल्यावर आधारित शिक्षण घेण्यावर भर देऊन प्रगती साधने शक्य असल्याचे स्पस्ट करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात मा. व्ही. वाय. पाटील (आबा ) यांनी प्राध्यापकांची विद्यार्थ्याप्रत असणारी मायेची भावना सांगितली. सामाजिक कार्यातील अनेक उदाहरणे सांगून विद्यार्थ्यांना सामाजिक प्रश्नांची जाणीव करून दिली. पारितोषिक प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन परीक्षा नियंत्रक डॉ. मोहन सदामते व क्रीडा विभागप्रमुख श्री विश्वास सावंत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी खरात व स्वप्नाली लाड यांनी केले.तर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. नवनाथ गुंड यांनी सर्वांचे आभार मानले.

| सांस्कृतिक विभाग प्रमुख | परीक्षा नियंत्रक | क्रीडा विभागप्रमुख | प्राचार्य |
|---|---|---|---|

**Principal**
Krantiagrani G.D.Bapu Lad
Mahavidayalaya,Kundal.

Krantiagrani Dr. G.D. Bapu Lad Mahavidyalaya, Kundal.